Indian Streams Research Journal
Vol.1,Issue.V/June; 12pp.1-4 डॉ.संभाजी मलघे, ISSN:-2230-7850

Research Papers

# नागनाथ कोत्तापल्ले यांच्या लेखनाच्या प्रेरणा

डॉ.संभाजी मलघे,
इंद्रायणी महाविदयालय,
तळेगाव दाभाडे.

## प्रस्तावना :—

लेखकाजवळ असलेल्या मूळच्या प्रतिभेला अविश्कृत करण्यासाठी लेखनप्रेरणा आवश्यक असते. लेखक ज्या कुटुंबात जन्म घेतो, ज्या समाजात तो वाढतो त्या कुटुंबाचा आणि समाजातील भोवतालच्या परिस्थितीचा परिणाम त्याच्यावर होत असतो. कोत्तापल्ले यांच्या साहित्यनिर्मिती मागे देखील अनेकविध प्रेरणा आहेत. मानवी मनाचा होणारा संकोच, माणसाचे दुःख, व्यथा, वेदना, मानवी जीवनातील दैन्य, दारिद्रय, उपासमार आणि माणसाचे होणारे शोशण यामुळे कोत्तापल्ले व्यथित होतात, त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या लेखनात पाहवयास मिळते.

मी का लिहीतो हे सांगताना कोत्तापल्ले म्हणतात, 'मला कोणते अनुभव लक्षणीय वाटले याचा जेव्हा मी शोध घेऊ लागतो, तेव्हा असे लक्षात येते की, भोवतालच्या जगाचे निरीक्षण करीत असताना एक असंतोश मनात निर्माण होत जातो. काही तरी अस्वस्थ करणारे मनाला बोचायला लागते. वाटते की आपल्याभोवतीचे हे जे वास्तव आहे. माणसाने आपल्या संकुचित स्वार्थासाठी निर्माण केलेले ते वास्तव आहे. असे जेव्हा वाटायला लागते तेव्हा जग कसे असावे याची एक कल्पना किंवा दृष्टी लेखकाजवळ असते. मला वाटते लेखकाची दृष्टी आणि भोवतीचे वास्तव यांच्या संघर्षातच लेखनाची बीजे दडलेली असतात. निदान माझ्या लेखनामध्ये निश्चित या गोष्टी आहेत असे वाटते. मला जाणीव झाली तेव्हापासून माझे लक्ष प्रथमतः जीवनातील दुःखाकडे जाते. मी ज्या परिस्थितीमध्ये वाढलो, त्यामुळेही असेल, परंतु मानवी दुःख, समाजातील असंतोष, वेदना या गोष्टी मला लिहायला उदयुक्त करतात. वाटते की, अरे, माणसाची काय ही अवस्था? माणसे अशी का वागताहेत? एकदुसऱ्याच्या जीवावर का उठताहेत?नितीची, मूल्यांची कसलीच चाड नाही. असे वागण्यातून या माणसांना खरोखरच सुख प्राप्त होत असेल का? शेवटी सुख कशात शोधायचे?खूप आर्थिक लाभ झाले म्हणजे सुख मिळते का? दारिद्रयातील माणसांना सुख नावाची गोष्ट मिळतच नाही का?माणसे खुळचट कल्पना का म्हणून जपत असतील? आज एकवीसाव्या शतकातही अंधश्रद्धेचे बळी ठरणारे हजारो लोक असतील. आजही जातीच्या आणि धर्माच्या नावावर लोक एकमेकांचे गळे कापताहेत. खरे म्हणजे 'माणूस' महत्वाचा. धर्म आणि जात या गोष्टी माणसांनीच निर्माण केलेल्या. कधीकाळी त्यांचा उपयोग असेलही, परंतु आज मात्र त्या निरर्थक झाल्या आहेत. धर्मातील असंख्य गोष्टी आज अर्थहीन झालेल्या आहेत. उदाहरणार्थ वटसावित्रीच्या दिवशी वडाची पूजा करणे. आजही शिकल्या, सवरलेल्या व उच्चविदयाविभूषित स्त्रिया वडाची फांदी विकत आणून पूजा करतात, तेव्हा वाटते की त्या आपल्या स्वातंत्र्याचा गळा स्वतःच घोटताहेत. तेव्हा प्रश्न असा आहे की, माणसे काहीच का विचार करीत नाहीत? सतराव्या शतकात किंवा त्यापूर्वी आपण ज्याप्रमाणे जीवन जगत होतो. त्याप्रकारे आपणांस का जगावेसे वाटते?आपले कपडे बदलले, अत्याधुनिक सुविधांचा वापर आपण करू लागलो, अगदी खेडयापर्यंत जगाची माहिती देणारी साधने जावून पोहचली, तरीही माणूस परंपरेच्या चक्रातून स्वतःची सुटका करून घेऊ इच्छित नाही. आणि समाजातील हितसंबंधी मंडळींना तर हे हवेच असते. देशीवाद, संस्कृती असल्या नावाने ते असल्या गोष्टींचा गौरवही करीत असतात. एकंदरीत काय की, माणूस आपल्याच वर्तनाने दुःखाची निर्मिती करीत असतो. आणि अशा दुःखाचा शोध घेण्यात मला लेखक म्हणून अधिक रस आहे. अशा शोध घेण्याच्या प्रेरणेतूनच मी आतापर्यंत लेखनाकडे वळलो असे वाटते.' या विवेचनावरून असे म्हणता येईल की, डॉ.कोत्तापल्ले यांच्या लेखनामागील प्रेरणा माणसाच्या जीवनातील दुःखाचा शोध घेणे हया असाव्यात.

डॉ.कोत्तापल्ले यांना साहित्य लेखनाची खरी प्रेरणा शालेय जीवनापासून मिळाली. शालेय जीवनात शिक्षण घेत असताना त्यांना लेखनाला प्रवृत्त करणारे अनेक शिक्षक लाभले आणि ते शिक्षक देखील स्वतःला लेखनाची आवड असणारे असे होते. त्यामुळे आपण देखील आपल्या शिक्षकांप्रमाणे लिहावे, आपले देखील कुठेतरी नाव छापून यावे असे कोत्तापल्ले यांना त्या वयात वाटत होते. या उर्मीतूनच ते लेखनाकडे वळले. या संदर्भात अनुभव सांगताना ते म्हणतात, ' मला आठवते, त्याप्रमाणे मी आठव्या इयत्तेमध्ये होतो, तेव्हापासून लिहीतो. अर्थात त्यावेळचे लिहीणे म्हणजे, एखादी कविता किंवा लेख असे होतं. आम्हाला इनामदार नावाचे शिक्षक होते. त्यांच्या कथा त्याकाळात 'प्रसाद' मासिकात छापून येत. मग मलाही वाटायचे की आपणही काही तरी लिहावे आपलेही नाव छापून यावे. मग मी लिहीत असे. अर्थातच

Please cite this Article as : डॉ.संभाजी मलघे, नागनाथ कोत्तापल्ले यांच्या लेखनाच्या प्रेरणा : Indian Streams Research Journal ,
(June ; 2012)

त्या काळात जे वाचलेले असे त्याची छाया त्यावर असायची. त्याकाळात लिहीलेला एक लेख माझ्या अजूनही स्मरणात आहे. 'पून्हा एकदा आपल्याला इतिहासाकडे वळावे लागेल' अशा शीर्षकाचा. तो कुठे छापून आला नाही. परंतु काही चांगले करायचे असेल तर आपल्याला इतिहासातूनच प्रेरणा घ्यावी लागेल असा त्याचा आशय होता. परंतु खऱ्या अर्थाने मी लेखन करू लागलो ते महाविदयालयामध्ये गेल्यानंतरच. म्हणजे साधारणतः 1967–68 नंतर. महाविदयालयात आम्हाला शिकवायला कवी व कादंबरीकार, प्रा.लक्ष्मीकांत तांबोळी हे होते. त्यांच्यामुळे वाचन खूप झाले. त्यांच्या 'दूर गेलेले घर' या कादंबरीचे पहीले श्रोते आम्हीच होतो. म्हणजे मी आणि माझा मित्र वसंत जाधव. प्रा.लक्ष्मीकांत तांबोळी यांच्या सहवासात वाचन आणि लेखन सुरू झाले. 'मराठा'ची रविवार पुरवणी, 'मांडवी'इ.नियतकालिकांमधून माझे लेखन छापून येऊ लागले.'

कोत्तापल्ले यांच्या साहित्य निर्मितीला आणखी एक बाब कारणीभूत ठरली. ती म्हणजे त्यांचा ग्रामीण साहित्य चळवळीत असलेला सक्रीय सहभाग. ग्रामीण साहित्य चळवळीत प्रत्यक्ष कार्य करीत असताना त्यांना ग्रामीण जीवनाचे विविधांगी दर्शन घडले. तेथील दैन्य, दुःख, दारिद्रय, उपासमार आणि माणसांचे होणारे शोषण यामुळे ते व्यथित झाले. याचा खोल परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्वावर झाला. यातूनच त्यांच्या 'गांधारीचे डोळे', 'उलट चालिला प्रवाहो', यासांरख्या कादंबऱ्या आणि काही कथा जन्माला आल्या. या संदर्भातील अनुभव व्यक्त करताना कोत्तापल्ले म्हणतात, '1971 मध्ये मी प्राध्यापक म्हणून रूजू झालो आणि जीवनाचे एक वेगळेच दर्शन मला झाले. मी प्राध्यापक झालो आणि दुसऱ्या वर्षापासून महाराष्ट्र दुष्काळ सुरू झाला. या दुष्काळाच्या काळात ग्रामीण भागातील शिकावयास येणाऱ्या विदयार्थ्यांचे खूप हाल व्हायचे ते सारे मी फार जवळून पाहत होतो. (या दुष्काळात शहरातून धान्य गोळा करण्याचे थोडेसे कामही केल्याचे आठवते) पुढे हा दुष्काळ तीव्र होत गेला. सरकारने सडका बांधणे, खडी सेंटर चालविणे इ. कामे काढली असली तरी ग्रामीण जीवनासमोर अगणिक समस्या उभ्या राहिल्या होत्या. बीड जिल्हयातील असंख्य खडी सेंटरला मी, डॉ.अरूण लिमये यांच्या बरोबर भेटी दिलेल्या होत्या. डॉ.अरूण लिमये पुण्याहून औषधांची व्हॅन घेवून आलेले होते आणि त्यांच्याबरोबर औषधे वाटत मीही पुष्कळ हिंडलो. या सगळया प्रवासात ग्रामीण जीवनाचे एक नवेच जीवघेणे दर्शन होत होते. भल्याभल्या पाटील – देशमुखांच्या लेकी–सूना खडी सेंटरवर होत्या. सगळे ग्रामीण जीवनच उद्‌ध्वस्ततेच्या खाईत उभे होते. हे एकीकडे होते. तर तिकडे नगरच्या बाजारात सोने, चांदी, खरेदी करणाऱ्यांची झुंबड उडाली होती. हे सोने, चांदी खरेदी करणारे होते, दुष्काळावर मजूरी वाटणारे शासकिय अधिकारी. हे सगळेच मोठे आंतर्मुख करणारे होते. मी खेडयात वाढलेला, शिकलेला पण या काळातले खेडे मात्र काळजावर डागण्या देणारे होते. आणखीही पुष्कळ पाहिले मी त्या काळात. पण हे सगळेच येथे कशाला सांगायचे? पण एक गोष्ट आवर्जून सांगितली पाहीजे. एवढया दुष्काळातही ग्रामीण भागातील ताणतणाव कधी कधी तीव्र होऊन जाई. बीड जिल्हयातल्या एका खेडयात आदीवासींच्या, दलितांच्या 19 झोपडया जाळण्यात आल्या होत्या. आणि या दलितांनी काही आरडाओरडा करू नये म्हणून त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला गेला होता. आणखी एका हायवेवरच्या गावी भर दुपारी पन्नास शंभर झोपडया जळत होत्या. या दोन्हीही ठिकाणी पहिल्यांदा जाणारा मी होतो. याचा अर्थ ऐवढाच की, ग्रामीण जीवनाचे एक निराळेच दर्शन मला झाले. याचे चित्रण 'उलट चालीला प्रवाहो' या माझ्या छोटेखानी कादंबरीमध्ये मी केले आहे.'

तात्पर्य – ग्रामीण साहित्य चळवळीतून जीवनाकडे पाहण्याची एक चौफेर अशी दृष्टी कोत्तापल्ले यांना यामधून प्राप्त झाली. याचे प्रतिबिंब त्यांच्या साहीत्य लेखंनात वारंवार दिसून येते.

1976 साली कोत्तापल्ले यांचा 'मूडस्' हा काव्यसंग्रह प्रसिध्द झाला पुस्तक रूपाने आलेले हे त्यांचे पहिले लेखन. आपल्या या सुरूवातीच्या लेखनासंदर्भात अनुभव सांगताना कोत्तापल्ले म्हणतात, 'कविता हा माझ्या आवडीचा वाङ्मय प्रकार आहे. मी लिहावयास लागलो ते कधीतरी आठवी नववी मध्ये आणि तीही कविताच लिहीयला लागलो. म्हणजे तेरा चौदाव्या वर्षी. आता मी कविताच का लिहू लागलो याचे उत्तर देता येणार नाही. कारण घरात तसे कवितेचे वातावरण नव्हते. वडील प्राथमिक शिक्षक, गणित हा त्यांच्या आवडीचा विशय. आजोबा शेती आणि पुढारपण करीत असत. घरात भजने वैगेरे काही प्रकार नव्हता. कविता लिहीली की, इनामदार गुरूजींना दाखव असा प्रकार सुरू झाला. शाळेच्या मासिकामध्ये कविता प्रसिध्द झाल्याचे आठवते. पुढे महाविदयालयात गेल्यानंतर खऱ्या अर्थाने कविता लेखन सुरू झाले.

याच काळात कोत्तापल्ले कथा लेखनही करू लागले. 1968–69 च्या दरम्यान त्यांची 'छेद' नावाची कथा 'प्रतिष्ठाण' या मासिकातून प्रसिध्द झाली. ही त्यांची पहिली कथा होय. पुढे 1980 मध्ये 'कर्फ्यु आणि इतर कथा' हा पहिला कथासंग्रह प्रसिध्द झाला. मानवी जीवनाचा स्वाभाविकपणे होणारा संकोच, माणसाला जीवन जगताना वाटयाला आलेली परिस्थिती, त्यातून माणसाचे होणारे घुसमटलेपण आणि मध्यमवर्गीय जीवनातील भावभावना, इच्छा आकांक्षा यांचे वैशिष्टपूर्ण चित्रण या कथा संग्रहातून साकारले. 1983 मध्ये त्यांचा 'संदर्भ' हा दुसरा कथा संग्रह प्रसिध्द झाला या कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाचा उत्तम कथा लेखनाचा पुरस्कार मिळाला. 'राजधानी' (1987), 'कवीची गोष्ट' (1993), 'रक्त आणि पाऊस'(1992), 'सावित्रीचा निर्णय' (1999), आणि 'देवाचे डोळे' असे एकुण 7 कथा संग्रह त्यांचे प्रकाशित झालेत.

कथा कविते बरोबर कोत्तापल्ले हे या काळात कादंबरी आणि समीक्षा लेखन करू लागले. 'उलट चालिला प्रवाहो', 'गांधारीचे डोळे' या दोन कादंबऱ्या त्यांनी 1985 मध्ये लिहील्या. 'गांधारीचे डोळे' या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा 'हरी नारायण आपटे' पुरस्कार मिळाला. 1978 मध्ये त्यांचे 'त्रिज्या' हे समीक्षेचे पुस्तक प्रकाशित झाले. त्यातून त्यांनी आधुनिक मराठी काव्यातील काही ठळक प्रवृत्ती–प्रवाहांची मीमांसा केली. 1985 मध्ये ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध हा समीक्षा ग्रंथ मराठी समीक्षेत मोलाचा ठरला. या ग्रंथाला महाराष्ट्र शासनाचा 'सर्वोत्कृष्ठ समीक्षाग्रंथ' पुरस्कार प्राप्त झाला. याशिवाय 'साहित्याचा अन्वयार्थ' (1996) आणि 'साहित्याचा अवकाश' (2003) हे दोन समीक्षाग्रंथ अलिकडेच प्रकाशित झालेले आहे.

याशिवाय कोत्तापल्ले यांचा 'उदयाच्या सुंदर दिवसांसाठी' हे ललित लेखनाचा संग्रह प्रकाशित झाला आहे.'उदयाच्या सुंदर दिवसांसाठी' माणसाने काय केले पाहीजे. यावर मार्मिक चिंतन या संग्रहातून आले आहे. त्याच बरोबर 'जोतिपर्व' (2000) हा महात्मा फुल्यांच्या जीवन कार्याचा आढावा घेणारा ग्रंथ प्रकाशित आहे.

कोत्तापल्ले यांच्या साहित्य निर्मितीचा प्रवास प्रदीर्घ आहे. त्यांनी साहित्य निर्मिती बरोबरच अनेक महत्वाची पदे भुशविली आहेत. अलिकडेच ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठाच्या कुलगुरू पदावरून निवृत्त झाले आहेत.

*संदर्भ :–*

1. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांची मुलाखत.
2. मराठी ग्रामीण कादंबरी, डॉ.रवींद्र ठाकूर.
3. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि वास्तव. डॉ. आनंद यादव.

**Please cite this Article as :** *डॉ.संभाजी मलघे , नागनाथ कोत्तापल्ले यांच्या लेखनाच्या प्रेरणा* **: Indian Streams Research Journal (June ; 2012)**

4. ग्रामीण साहित्याचा इतिहास, डॉ.चंद्रकुमार नलगे.
5. ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही, डॉ.वासुदेव मुलाटे.
6. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, डॉ.नागनाथ कोत्तापल्ले.
7. 'मूडस्', डॉ.नागनाथ कोत्तापल्ले.
8. 'त्रिज्या,' डॉ.नागनाथ कोत्तापल्ले.
9. 'साहित्याचा अन्वयार्थ.', डॉ.नागनाथ कोत्तापल्ले.
10. 'साहीत्याचा अवकाश',. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले.
11. 'राजधानी', डॉ.नागनाथ कोत्तापल्ले.
12. 'कर्फ्यु आणि इतर कथा' ,डॉ.नागनाथ कोत्तापल्ले.

**Please cite this Article as :** *डॉ.संभाजी मलघे , नागनाथ कोत्तापल्ले यांच्या लेखनाच्या प्रेरणा* **: Indian Streams Research Journal (June ; 2012)**